# अमरावती महानगरपालिका अमरावती

## स्वच्छता विभाग

जा.क्र.:- अमनपा/स्व.वि/ 681 /2026 दिनांक :-24 / 07 /2026

-: सूचना :-

विषय : अमरावती महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक शौचालये व सार्वजनिक मूत्रालयांच्या स्वच्छता व निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक स्वच्छता साहित्य खरेदीकरीता स्थानिक बाजारपेठेतील विविध व्यावसायिक/पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेबाबत.

अमरावती महानगरपालिका हद्दीत महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली एकूण १४४ सार्वजनिक शौचालये व सार्वजनिक मूत्रालये असून त्यामध्ये सुमारे १,४०० आसने (महिला व पुरुष मिळून) उपलब्ध आहेत. सदर सार्वजनिक शौचालये व मूत्रालयांची नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण, दुर्गंधी नियंत्रण व नागरिकांना स्वच्छ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध स्वच्छता साहित्याची आवश्यकता आहे.

त्याअनुषंगाने अमरावती शहरातील विविध व्यावसायिक, अधिकृत विक्रेते, वितरक व पुरवठादार यांच्याकडून स्पर्धात्मक दरपत्रके (Quotation) मागविण्यात येत आहेत.

दरपत्रकामध्ये खालील साहित्याचे दर स्वतंत्रपणे नमूद करावेत –

1. टॉयलेट क्लिनिंग ऍसिड (Toilet Cleaning Acid)
2. फिनाईल
3. हात धुण्याचे लिक्विड (Liquid Hand Wash)
4. प्लास्टिक झाडू
5. टॉयलेट ब्रश

दरपत्रकामध्ये खालील बाबी नमूद करणे आवश्यक राहील –

1. साहित्याचे नाव, कंपनी व दर्जा (Specification/Quality).
2. प्रति नग/प्रति लिटर/प्रति किलो दर.
3. जीएसटीचा तपशील व जीएसटीसह एकूण दर.
4. पुरवठा करण्याचा कालावधी.
5. उपलब्ध साठ्याची माहिती.
6. आवश्यक असल्यास नमुना (Sample) उपलब्ध करून देण्याची तयारी.
7. सर्व साहित्य दर्जेदार व शासनमान्य निकषांनुसार असावे.
8. आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने पुरवठा करण्याची तयारी दर्शविणे बंधनकारक राहील.

इच्छुक व्यावसायिकांनी आपले सीलबंद दरपत्रक आवश्यक कागदपत्रांसह दिनांक २९/०७/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्वच्छता विभाग, अमरावती महानगरपालिका, अमरावती येथे सादर करावे. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

अमरावती महानगरपालिकेस कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राहील. तसेच ही सूचना केवळ दरपत्रके मागविण्यासाठी असून, यामुळे कोणत्याही व्यावसायिकास खरेदी आदेश देण्याचे बंधन महानगरपालिकेवर राहणार नाही.

**वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता)**
**महानगरपालिका, अमरावती**

प्रतिलिपी :

**1. मा. आयुक्त, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव सविनय सादर.**
**2. मा. अतिरिक्त आयुक्त-२, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव सविनय सादर.**
**3. मा. उपायुक्त-१, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव सादर.**

Scanned with OKEN Scanner